ePaper

वर्ष - 9 । अंक -55 | UDYAM-MH-26-0158827

# बीडमध्ये ओबीसींची महाएल्गार सभा, आता जरांगे संतापले!



महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने हरता
- पाकिस्तानात सुरक्षेचे तीन तेरा!
- तेलंगणामध्ये मतदार याद्यांमध्ये घोळ?
- गुजरातच्या राजकारणात फेरबदल

## लोकशाहीसाठी ही धोक्याची घंटा; आयोगाने तातडीने चौकशी करावी–रोहीत पवार

# प्रत्येक मतदारसंघात बनावट मतदार!

## रोहीत पवारांचा भाजप व निवडणूक आयोगावर गंभीर आरोप



। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर बनावट मतदारांची नावे घुसवण्यात आल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहीत पवार यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केला. राज्यातील प्रत्येक मतदारसंघात सरासरी ३० हजार बनावट मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली असून, काही ठिकाणी हा आकडा १० हजारांपासून थेट ६० हजारांपर्यंत गेल्याचा दावा त्यांनी केला. या कारस्थानामागे भाजपचे पदाधिकारी देवांग दवे असल्याचा आरोप करत पवार यांनी थेट निवडणूक आयोगालाही जबाबदार धरले.**

### “देवांग दवे यांनी आयोगाचे संकेतस्थळ वापरून केला गैरप्रकार”

पवार म्हणाले, “निवडणूक आयोगाचे अधिकृत संकेतस्थळ सांभाळण्याची जबाबदारी भाजपचे पदाधिकारी देवांग दवे यांच्याकडे आहे. यादीत कोणाचे नाव समाविष्ट करायचे किंवा काढायचे, हे दवे ठरवतात. त्याच माध्यमातून मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर खोटी नावे घालण्यात आली. या गैरप्रकारात सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनाही विश्वासात घेण्यात आले आहे.”

त्यांच्या म्हणण्यानुसार, या बनावट मतदारांना इतर मतदारसंघातून पैसे देवून मतदानासाठी आणले गेले. “आमच्या कार्यकर्त्यांनी याचा सखोल तपास केला. त्या-त्या मतदारसंघातील हजारो नव्याने समाविष्ट झालेल्या नावांचा शोध घेतला, पण प्रत्यक्षात असा एकही मतदार सापडला नाही. हे लोक मतदानाच्या दिवशी गाड्यांमधून आणले गेले, मतदान केले आणि परत पाठवले गेले. या संदर्भातील पुरावे आमच्याकडे उपलब्ध आहेत,” असे रोहीत पवार यांनी स्पष्ट केले.

### “आयोगाने माहिती देण्यास नकार दिला”

या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे अधिकृतरीत्या माहिती मागितली होती. मात्र, आयोगाने ती माहिती देण्यास नकार दिल्याचे पवार यांनी सांगितले. “आम्ही मतदार याद्यांचे विश्लेषण मागितले होते, पण आम्हाला सांगण्यात आले की ही माहिती देऊ शकत नाही. आम्हाला डिजीटल स्वरूपात मतदार याद्या दिल्या जाव्यात, बीएलओ अधिकाऱ्यांनी मतदारांची नोंद कशी केली याची माहिती मिळावी, मतदानाच्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून द्यावे – अशा अनेक मागण्या आम्ही केल्या आहेत,” असे ते म्हणाले.

### “काही मतदारसंघांत संशयास्पद वाढ”

रोहीत पवार यांनी यावेळी मतदारसंघानुसार वाढ झालेल्या मतदारांची आकडेवारीही सादर केली. त्यानुसार, कल्याण ग्रामीणमध्ये ५७ हजार, भोसरीत ५६ हजार, मीरा-भाईंदरमध्ये ५३ हजार, नालासोपाऱ्यात ५० हजार, चिंचवडमध्ये ४५ हजार, हडपसरमध्ये ४३ हजार, शिरुरमध्ये १० हजार २३०, वडगाव शेरीत ११ हजार ०६४, खडकवासला १२ हजार ३३०, पर्वती ८ हजार २३८, पिंपरीत ५४ हजार आणि पनवेलमध्ये तब्बल ६५ हजार मतदार वाढल्याचा त्यांनी दावा केला.

“या आकड्यांवरून स्पष्ट होते की गेल्या काही महिन्यांत निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणावर मतदारसंख्या वाढवण्यात आली आहे. ही नैसर्गिक वाढ नाही. निवडणूक यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार घडवून आणला गेला आहे,” असे पवार म्हणाले.

### “पुरुष महिला म्हणून, पत्ता बदलून तीनवेळा नावे”

पवार यांनी पुढे सांगितले की, या मतदार याद्यांमध्ये अत्यंत हास्यास्पद चुका आणि फेरफार आढळून आले आहेत. “एका मतदाराचे नाव घराचा पत्ता बदलून दोन ते तीन वेळा नोंदवले गेले आहे. काही ठिकाणी पुरुष मतदारांना महिला मतदार म्हणून दाखवले आहे. अशा शेकडो उदाहरणांची यादी आमच्याकडे आहे,” असे त्यांनी सांगितले. याच पार्श्वभूमीवर त्यांनी पत्रकार परिषदेत सादर केलेल्या पीपीटी प्रेझेंटेशनमध्ये अनेक उदाहरणे दाखवली. पत्ता, लिंग आणि वय यामध्ये झालेल्या विचित्र बदलांमुळे हा संपूर्ण प्रकार योजनाबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

### “डोनाल्ड ट्रम्पचे ‘आधार’ तयार केले”

या प्रकरणाची गंभिरता अधोरेखित करण्यासाठी पवार यांनी एक धक्कादायक उदाहरण सादर केले. त्यांनी सांगितले की, “आम्ही ऑनलाईन सिस्टीममधून अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचेही ‘आधार कार्ड’ तयार करून दाखवले. यावरून हे स्पष्ट होते की कोणाच्याही नावाने सहजपणे आधार कार्ड आणि त्यावर आधारित मतदार ओळखपत्र बनवता येते.”

त्यांनी पुढे म्हटले की, “जर इतक्या सहजतेने आधार आणि मतदार ओळखपत्र तयार होऊ शकतात, तर लोकशाही प्रक्रियेचा पाया हादरतो. या प्रणालीचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत आहे.”

### “लोकशाहीसाठी धोक्याची घंटा”

या सर्व प्रकारामुळे लोकशाही धोक्यात आल्याचा इशारा देत रोहीत पवार म्हणाले, “मतदान ही लोकशाहीची आत्मा आहे. पण जर मतदानाची प्रक्रिया खोटी आणि बनावट मतदारांवर आधारित असेल, तर लोकशाहीची मुळंच उखडली जातील. म्हणूनच आम्ही आयोगाकडे संपूर्ण चौकशीची मागणी करत आहोत. सत्य समोर आलंच पाहिजे.”

त्यांनी निवडणूक आयोगाने तातडीने स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून प्रत्येक मतदारसंघातील मतदार याद्या तपासाव्यात, तसेच दोषींवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणीही केली.

### “आमच्याकडे पुरावे आहेत”

“हा आरोप केवळ राजकीय नाही,” असे स्पष्ट करताना पवार म्हणाले, “आमच्याकडे पुरावे, यादी आणि डिजिटल विश्लेषण उपलब्ध आहे. आम्ही हे सर्व आयोगासमोर आणि न्यायालयात सादर करू. आम्हाला सत्य बाहेर आणायचं आहे — कारण निवडणुकीचा निकाल लोकांच्या मतांवर नव्हे, तर सिस्टीमच्या फेरफारांवर अवलंबून राहू लागला, तर लोकशाहीचं भविष्य धोक्यात येईल.”

रोहीत पवार यांच्या या आरोपांनंतर राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजपकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. या आरोपांची चौकशी होणार का, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## 'टेस्ला मोमेंट' चाकणमध्ये इलेक्ट्रिक ट्रकची आवश्यकता : देवेंद्र फडणवीस

# भारतातील 'टेस्ला मोमेंट' चाकणमध्ये सुरू!

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बॅटरीची अदलाबदल करता येणारा इलेक्ट्रिक ट्रक हे मालवाहतूक क्षेत्रातील क्रांतिकारी पाऊल आहे. ही भारतातील ट्रक क्षेत्रातील 'टेस्ला मोमेंट' आहे. यातील तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता लक्षात घेऊन आगामी काळात या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल. राज्य शासन मुंबई-पुणे इलेक्ट्रिक कॉरिडॉरसारखे अन्य कॉरिडॉर करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.**

## 'मेड इन इंडिया' ट्रकची निर्मिती




## ई-वाहन क्षेत्राला प्रोत्साहन

ही बाब देशाचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार करण्यासारखी आहे. इलेक्ट्रिक ट्रकसाठी संपूर्ण क्लिष्ट अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची संकल्पना आणि निर्मिती, तंत्रज्ञान देशातच त्यातही महाराष्ट्र आणि पुण्यात निर्माण होणे, ही अभिमानाची बाब आहे.महाराष्ट्र शासनाने ई-वाहन क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण, तसेच पर्यायी इंधन धोरण अशी शाश्वत धोरणे स्वीकारली आहेत.

निघोजे येथील ब्ल्यू एनर्जी मोटर्सच्या इलेक्ट्रिक ट्रकच्या अनावरणप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, महेश लांडगे, बाबाजी काळे, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, ब्ल्यू एनर्जी मोटर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध भुवलकर, धीरेंद्र शास्त्री बागेश्वरबाबा, प्रशांत रुईया, अंशुमन रुईया, अमित बजाज, कौस्तुभ धवसे आदी उपस्थित होते.फडणवीस म्हणाले, 'मालवाहतूक करणाऱ्या ट्रकद्वारे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होत असल्याने सार्वजनिक वाहतुकीच्या क्षेत्रात इलेक्ट्रिक ट्रकची आवश्यकता होती. या क्षेत्रात ब्ल्यू एनर्जीने उत्तम काम करून 'मेड इन इंडिया' ट्रकची निर्मिती केली आहे. ही बाब देशाचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार करण्यासारखी आहे. इलेक्ट्रिक ट्रकसाठी संपूर्ण क्लिष्ट अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची संकल्पना आणि निर्मिती, तंत्रज्ञान देशातच त्यातही महाराष्ट्र आणि पुण्यात निर्माण होणे, ही अभिमानाची बाब आहे.महाराष्ट्र शासनाने ई-वाहन क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण, तसेच पर्यायी इंधन धोरण अशी शाश्वत धोरणे स्वीकारली आहेत. या क्षेत्रातील उद्योगाला त्याचा फायदा व्हावा आणि पर्यावरणाचे या माध्यमातून रक्षण व्हावे हे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र शासन मुंबई-पुणे इलेक्ट्रिक कॉरिडॉरसाठी, तसेच अन्यत्रही बॅटरी स्वॅपिंग (अदलाबदल) आणि चार्जिंगच्या कॉरिडॉरसाठी ब्ल्यू एनर्जीसोबत काम करेल. या ट्रकच्या किमती डिझेल वाहनांशी स्पर्धा करणाऱ्या असल्याने या वाहनांना चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. दावोस येथे जानेवारीत झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ब्ल्यू एनर्जी कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला होता. त्या करारानुसार ब्लू एनर्जी कंपनीचा प्रकल्प आज सुरू होत आहे. दावोस येथे झालेले करार प्रत्यक्षात येत आहेत. कंपनीकडून पहिल्या टप्प्यात १० हजार ट्रक तयार होत आहेत. थोड्याच दिवसांत हा आकडा वाढत जाणार आहे. महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे पहिल्या पसंतीचे राज्य आहे. ब्ल्यू एनर्जी कंपनीचा प्रकल्प सुरू होऊन उत्पादन सुरू झाले असून, रोजगारनिर्मिती झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी इलेक्ट्रिक ट्रक कंपनीच्या आवारात चालविला. नवे तंत्रज्ञान समजून घेताना ते हाताळण्याचे कसबही त्यांनी दाखवून दिले. या वेळी कंपनीच्या मुंबई–पुणे इलेक्ट्रिक कॉरिडॉरचे उद्घाटनही करण्यात आले.निघोजे येथील ब्ल्यू एनर्जी मोटर्सच्या इलेक्ट्रिक ट्रकच्या अनावरणप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, महेश लांडगे, बाबाजी काळे, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, ब्ल्यू एनर्जी मोटर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध भुवलकर, धीरेंद्र शास्त्री बागेश्वरबाबा, प्रशांत रुईया, अंशुमन रुईया,आदी उपस्थित होते.फडणवीस म्हणाले, 'मालवाहतूक करणाऱ्या ट्रकद्वारे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होत असल्याने सार्वजनिक वाहतुकीच्या क्षेत्रात इलेक्ट्रिक ट्रकची आवश्यकता होती.

# विमानतळासाठी सात गावांतील ड्रोन सर्वेक्षण

## मोबदल्याचा प्रस्ताव दिवाळीनंतर राज्य शासनाकडे

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांमधील १ हजार २८५ हेक्टर जागेचे ड्रोन सर्वेक्षण जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, येत्या दोन दिवसांमध्ये प्रत्यक्षात जागेची मोजणीप्रक्रिया पूर्ण होणार असून ही प्रक्रिया मुदतीपूर्वी पूर्ण होणार असल्याचा दावा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.**



## भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू

उर्वरीत सुमारे ६० ते ६४ हेक्टर जमिनीची दोन दिवसांत मोजणी पूर्ण होईल,'असे डुडी यांनी सांगितले.मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. जमिनीची मोजणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांशी दिवाळीनंतर चर्चा करण्यात येईल. त्यानंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदल्याचा प्रस्ताव सरकारला पाठविण्यात येईल. त्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू होईल.

दरम्यान, विमानतळाच्या भूसंपादनासाठी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याचा प्रस्ताव दिवाळीनंतर राज्य शासनाला पाठविण्यात येणार आहे.पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणीप्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली होती. पुरंदर तालुक्यातील एखतपूर, उदाचीवाडी, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण, खानवडी आणि पारगाव अशा सात गावांमधून १ हजार २८५ हेक्टर म्हणजे तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ३ हजार २०० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागा देण्यासंदर्भातील संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत.विमानतळासाठीच्या सात गावांतील जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करून मोजणी पूर्ण करण्यात आली आहे.

ती दोन दिवसांमध्ये पूर्ण होईल, असा दावाही त्यांनी केला.'तालुक्यातील एखतपूरमध्ये २०१ हेक्टर, मुंजवडीत १०० हेक्टर, उदाचीवाडीत ५९ हेक्टर, कुंभारवळणात २६३ हेक्टर, वनपुरीत १८३ तसेच खानवडीत २९८ हेक्टर आणि पारगावमध्ये १२३ हेक्टर इतक्या जागेची मोजणी पूर्ण करण्यात आली आहे.

DPU
SUPER SPECIALTY
HOSPITAL
(A Unit of Dr. D.Y. Patil Medical College, Hospital & Research Centre)
PIMPRI, PUNE



**डॉ. पी. डी. पाटील**
कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)



**डॉ. सौ. भाग्यश्रीताई पी. पाटील**
प्र-कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)



**डॉ. यशराज पी. पाटील**
विश्वस्त खजिनदार
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.)
पिंपरी, पुणे
(अभिमत विद्यापीठ)

# जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सर्व सेवा सुविधांनी परिपूर्ण रुग्णालय

**अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि तत्पर उपचार उत्तम रुग्णसेवेसाठी आम्ही वचनबद्ध आहोत.**




- रोबोटिक सर्जरी सेंटर
- कृत्रिम गर्भधारणा व एन्डोस्कोपी सेंटर
- अवयव प्रत्यारोपण सेंटर
- हृदयरोग शस्त्रक्रिया
- TAVI क्लिनिक
- अत्यावश्यक वैद्यकीय सेवा
- मज्जासंस्था (न्यूरो) उपचार
- मूत्रविकार व मूत्रपिंड उपचार
- श्वसन व पोटाचे आणि त्वचारोग उपचार
- कॉक्लियर इम्प्लांट
- अस्थिरोग व रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रिया
- माता आणि बाल विभाग (45 बेडस् चे नवजात अतिदक्षता विभाग व अत्याधुनिक स्वतंत्र प्रसूती संकुल)
- अत्याधुनिक रेडिओलॉजी विभाग

2011 बेड्स | 181 अतिदक्षता विभाग बेड्स | 32 अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह | 24 प्रशस्त ओपीडी

**मोफत प्रसूती (नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन) ची सुविधा उपलब्ध.**

स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग व वेलनेस सेंटर | सुसज्ज आंतररुग्ण विभाग | PMJAY / MJPJAY / RBSK / CGHS / CSMA /ECHS /MPKAY / Central Railway / ESIS / Dhanwantari gold scheme PCMC / शहरी गरीब आरोग्य योजना PMC सर्व शासकीय व खाजगी विमा संरक्षण (इन्शुरन्स) तसेच कॉर्पोरेट कंपनीशी संलग्न आरोग्य विमा संरक्षण

कॉल सेंटर क्र: + 91 706 599 5999 | प्रायव्हेट ओ.पी.डी. क्र: 020-6711 6401
आपत्कालीन संपर्क: 020-6711 6469 | रुग्णवाहिका क्र: +91 888 080 2020
डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे - 411 018

info@dpuhospital.com | www.dpuhospital.com

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक | नागरिकांशी विविध तक्रारीवर संवाद

# पालकमंत्र्यांचा 'जनसंवाद'; भाजपने केली 'जनकी बात'!

## चिंचवड मतदारसंघात आमदार जगताप यांच्याकडून नागरिकांच्या तक्रारीचे निवारण

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका पुन्हा ताब्यात घेण्यासाठी शहरात भाजप आणि राष्ट्रवादी प्रचंड प्रयत्नशील आहेत. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्यातील पालकमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरात जनसंवाद, परिवार मिलन, पाहणी दौरे यांसारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेच्या संपर्कात जास्तीत जास्त जाण्याचा प्रयत्न करत असतानाच याला भाजपकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात येत आहे. याचाच भाग म्हणजे बुधवारी अजित पवारांनी शहरात जनसंवाद घेतला त्याच्याच दुसऱ्या दिवशी भाजपकडून आमदार शंकर जगताप यांनी ' जन की बात ' या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांशी विविध तक्रारीवर संवाद साधला.**




अजित पवारांचा जनसंवाद कार्यक्रम चिंचवड विधानसभेत पार पडल्यानंतर अवघ्या चोवीस तासांत भाजपचे आमदार शंकर जगताप यांनी "जन की बात" या संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. रहाटणी, काळेवाडी या भागामध्ये ज्योतिबा मंगल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका विभागाशी संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### महापालिका निवडणुकीमध्ये राजकीय रंग चढणार

पिंपरी चिंचवड शहरामध्ये राजकारण तापायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीमध्ये राजकीय रंग चांगला चढणार असल्याचे दिसत आहे. यातच भाजपचा पारंपरिक गड मानल्या जाणाऱ्या चिंचवड मतदारसंघात तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसने "फोकस" केल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने अनेकदा प्रयत्न केले, मात्र प्रत्येक वेळी या मतदारसंघात भाजपनेच मुसंडी मारली.

आलेल्या तक्रारीचे थेट अधिकाऱ्यांकडे विचारणा करत त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना या कार्यक्रमात करण्यात आल्या. नागरिकांकडूनही या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. एका आठवड्याभराची मुदत देत या तक्रारींचे पुन्हा एकदा सर्वेक्षण केले जाईल असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले. अजित पवार यांच्या जनसंवाद कार्यक्रमाविषयी बोलताना जगताप म्हणाले, "अजित पवार हे मोठे नेते आहेत, उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना शह देण्यासाठी मी कार्यक्रम घेत नाही. आम्ही महायुती म्हणूनच काम करतो."' जन की बात' मधून मी नागरिकांचं म्हणणं ऐकतो." असेही जगताप यावेळी म्हणाले.

सातत्यपूर्ण नागरिकांशी संवाद - जगताप

आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केलं की, "आमदार झाल्यापासून लोकांशी संवाद हा माझा सातत्याने सुरू असलेला उपक्रम आहे. हा कोणाला उत्तर देण्यासाठी नाही, केवळ योगायोग आहे." त्यांनी सांगितलं की, आतापर्यंत "आमदार आपल्या दारी" या माध्यमातून १३ मेळावे घेतले असून हजारो तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. आता प्रत्येक प्रभागात "जन की बात" अंतर्गत थेट नागरिकांशी संवाद साधून अडचणी सोडवल्या जात आहेत. नगरसेवक नसल्याने नागरिकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. "त्या सोडवण्यासाठी आम्ही थेट लोकांशी संवाद साधत आहोत. यातून लोकांची सेवा हेच उद्दिष्ट असल्याचे जगताप म्हणाले.

# शहरातील २७ मालमत्तांची जप्ती!

## पिंपरी महापालिकेच्या जप्ती पथकांची थेट कारवाई सुरु

।पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून, थकबाकीदारांवर जप्तीची कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील २७ मालमत्तांची जप्ती करण्यात आली आहे. थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या असून विविध ठिकाणी थेट मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यासाठी करसंकलन विभागाच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कारवाई सुरु आहे.**



महापालिकेकडून वारंवार आवाहन करून, नोटीस देऊन देखील मालमत्ता कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांची मालमत्ता जप्त करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सर्व विभागीय कार्यालयांना दिले आहेत. ही मोहीम पुढील महिनाभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून याकाळात मालमत्ताकर थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांवर कारवाई होणार आहे अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली. या कारवाईसाठी १८ विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली असून, शहरातील निवासी तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांवर कारवाई सुरू आहे. १ ऑक्टोबर २०२५ पासून विभागीय कार्यालयातील पथकांनी थकबाकीदारांच्या मालमत्तांना भेट देऊन जप्ती प्रक्रिया सुरू केली आहे. दिवसभरात १८ विभागीय कार्यालयांतर्गत १८ पथके वसुली मोहिम राबवत आहेत. आतापर्यंत २७ मालमत्ता सील करण्यात आले असून काही मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन देखील खंडीत करण्यात आले आहे.

कारवाईदरम्यान १२५ थकबाकीदारांनी तत्काळ कराचा भरणा करून मालमत्तेवरील कारवाई टाळली आहे.

> थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी महापालिकेकडून मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरु करण्यात आली आहे. या कारवाईत कोणत्याही प्रकारची शिथिलता ठेवली जाणार नाही. मालमत्ता कर थकबाकीदारावंर मालमत्ता जप्ती , नळकनेक्शन खंडीत करणे यासारखी कठोर कारवाई सुरु करण्यात आली आहे
>
> **-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त , पिंपरी चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महापालिकेने कर वसुलीबाबत आता कठोर भूमिका घेतली आहे. थकबाकीदारांना वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यास महापालिकेस जप्ती कारवाई करणे भाग पडणार आहे. विभागीय कार्यालयांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले असून, थकबाकीदारांनी तात्काळ मालमत्ता कराची थकीत रक्कम भरुन सहकार्य करावे.
>
> **-अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# ‘उचल’ लवकरच कायद्याच्या चौकटीत?



## भूमिका

**साखर उद्योग हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र या उद्योगाचा पाया असलेला ऊसतोड मजूर मात्र कायमच दुर्लक्षित राहिला आहे. सरकारकडून ऊसतोड मजुरांसाठी स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करून तो येत्या हिवाळी अधिवेशनात मांडला जाण्याची शक्यता आहे.**

या कायद्याच्या माध्यमातून ऊसतोड मजुरांना आरोग्य, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण प्रदान करण्याबरोबरच ऊस वाहतूकदार, मुकादम व साखर कारखान्यांच्या होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल, असे दिसते. ऊसतोड मजुरांचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आणि विविध स्वरूपाचे असले तरी त्यांच्या मुळाशी या व्यवसायामध्ये रूढ असलेली ‘उचल’ हीच प्रमुख समस्या आहे. महाराष्ट्रात ऊसतोडणीचा हंगाम साधारणपणे दसऱ्याच्या सणापासून ते अक्षय तृतीयेपर्यंत असतो. त्याच्या तीन महिने आधीच म्हणजेच श्रावणापासूनच मजुरांना उचल दिली जाते. ती येणाऱ्या हंगामात ऊस तोडून फेडावी लागते. गरिबांना अनेकदा उचल घेण्याशिवाय पर्याय नसतो. सर्वाधिक ऊसतोड मजूर पुरविणाऱ्या बीड जिल्ह्याची ‘जिल्हा मध्यवर्ती बँक’ बुडणे आणि असंख्य मजुरांना ‘उचल’ घेऊन कोयता हातात घेण्यास भाग पडणे, हा योगायोग नसून या व्यवस्थेतील विसंगतीचे प्रतीक आहे.ऊसतोड मजुरांचे अगदी सुरुवातीच्या काळातील हंगामी स्थलांतर हे पाथर्डी, आष्टी, पाटोदा, शिरूर या डोंगराळ व दुष्काळी तालुक्यांमधून पश्चिम महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांकडे होत असे. या भागातील निवडक अल्पभूधारक शेतकरी कुटुंबांचा जगण्याचा आणि जनावरे जागविण्याचा ऊसतोड हा केवळ जोडधंदा होता. परंतु अलीकडील काळात राज्यात वाढत असलेले उसाचे क्षेत्र, साखर कारखान्यांची वाढलेली संख्या यामुळे ऊसतोडणी मजुरांची मागणी जास्त आहे. संपूर्ण मराठवाडा, विदर्भातील काही जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातील मोठा भाग ऊस तोडणीसाठी उचल घेत आहे. मुकादमाकडून घेतलेली उचल फेडण्यासाठी त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, पहाटेपासूनच मेहनत करावी लागते. मजूर जोडप्यांना दिवसभरात सरासरी तीन ते साडेतीन टन ऊसतोड करावी लागते तरीही दिवसाला जास्तीत जास्त ७५० रुपये पदरात पडतात. ऊसतोडणीचा ‘सिझन’ कमीतकमी १४० दिवस चालला पाहिजे परंतु असे होत नाही. गत वर्षी तर केवळ ८३ दिवसच ‘सिझन’ झाला. यामुळे मागील हंगामातील थकबाकी आणि पुढच्या हंगामातील देण्यात येणारी उचल यामुळे मजूर कायमस्वरूपी कर्जाच्या जाळ्यात अडकतात. कोणी रोखीने सर्व उचल फेडून या चक्रातून बाहेर पडू इच्छित असेल, तर मुकादम दरमहा ५ ते १० टक्के व्याज दराने परतफेड करण्यास सांगतात, जे की बहुतांश मजुरांना शक्य होत नाही. परिणामी, ऊसतोडीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडता येत नाही व वेठबिगारीचे जीवन जगावे लागते. यात कधी मुकादम तर कधी मजूर भरडले जातात.

मात्र या सर्व प्रकारात एकट्या मजुराला, मुकादमाला किंवा साखर कारखान्यांना सरसकटपणे दोषी धरता येणार नाही. उलट, ही व्यवस्था सरकारच्या हस्तक्षेपाने आणि स्वतंत्र कायद्याद्वारे सुधारण्याची गरज आहे.साखर कारखाने दरवर्षी उचलीपोटी कोट्यवधी रुपयांची रक्कम संबंधित ट्रस्टना देतात. हे ट्रस्ट अप्रत्यक्षरीत्या कारखान्यांच्या माध्यमातूनच स्थापन केलेले असतात. पुढे, कारखान्यांकडून मिळालेली रक्कम, या ‘ट्रस्ट’द्वारे ट्रक किंवा ट्रॅक्टर वाहतूकदारांना दिली जाते. ते मुकादमांना आणि मुकादम ऊसतोडणी मजुरांना उचलीच्या स्वरूपात पैसे पुरवतात. या प्रक्रियेत प्रत्येक टप्प्यावर तोंडी किंवा लिखित करार केले जातात. पण, ते कायदेशीर दृष्टिकोनातून किती परिपूर्ण आणि न्याय्य असतात याबद्दल शंका आहे. कारण उचलीची परतफेड होत नाही किंवा मजूर कामावर येत नाहीत तेव्हा करारपत्रांचा आधार घेऊन, कायदेशीर कार्यवाही न होता, बेकायदेशीरपणे वसुली केली जाते. धमकी, मारहाण, डांबून ठेवणे, अपहरण इत्यादी बेकायदेशीर बाबी केल्या जातात. बाळगणारे असंख्य ऊसतोड मजूर आहेत. मात्र याच्या उलट, उचल घेऊनही कामावर न येणारे, हंगाम अर्ध्यात सोडून पळून जाणारे किंवा फसवणूक करणारे मजूरही दिसून येतात. त्यांची झळ साखर कारखाना, वाहतूकदार, मुकादम आणि खुद्द प्रामाणिक मजूर या सर्वांनाच बसते.



## प्रासंगिक »

# खिंडीतला खेळ

***सामरिक व व्यापारी गरजांतून तालिबानशी जुळवून घेण्याच्या नीतीत सावधपणा हवा.***

जागतिक राजकारणाच्या पटलावर ज्या झपाट्याने नवे मैत्रीबंध जुळून येत आहेत आणि जुने कोलमडून पडत आहेत, ते पाहता आज नेमके मित्र कोणास मानावे नि शत्रू कोणास समजावे हेच कळेनासे झाले आहे. ज्या अमेरिकेशी संबंध दृढ करण्यासाठी भारताने गेली जवळपास २५ वर्षे प्रयत्न केले नि त्यास अमेरिकेकडूनही प्रतिसाद पुरेपूर मिळाला, त्या अमेरिकेने आज भारताचा शत्रू क्रमांक एक असलेल्या पाकिस्तानशी चुंबाचुंबी आरंभली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे शत्रूपेक्षा मित्रांचाच छळ करण्यासाठी प्रसिद्ध. त्यांना सौद्यांमध्ये रस आणि प्रक्रियेविषयी तिटकारा. त्यामुळे लोकशाही मार्ग आचरणाऱ्या भारतापेक्षा हुकूमशाही वाटेने जाणारा पाकिस्तान त्यांना अधिक भावतो हे स्वाभाविकच. पण पाच वर्षांपूर्वी सीमा मुद्द्यावरून भारताशी जुने भांडण उकरून काढणाऱ्या चीनला गतवर्षीपासून भारताविषयी अचानक ममत्व वाटू लागले.

दिवाळीदरम्यान तीन दिवस दिल्ली आणि परिसरात ‘ग्रीन’ – म्हणजे ‘पर्यावरणपूरक’नसले तरी पर्यावरणास कमी अपायकारक म्हणून ‘हरित’- फटाक्यांना परवानगी देऊन सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीमधल्या प्रदूषणाच्या प्रश्नावर मोठा सुज्ञ मार्ग काढला अशी कोणाची समजूत असेल, तर ते भाबड्यांच्या नंदनवनात राहतात, असे म्हणावे लागेल.

# प्रदूषणच, पण फक्त फटाक्यांचे नव्हे

अनेक कारणांमुळे होणारे हवेचे प्रदूषण हा मुद्दा दिल्लीतच नाही, तर देशभर सगळीकडेच धोक्याच्या पातळीवर येऊन पोहोचलेला असताना दोनच दिवस आणि संध्याकाळी दोनच तास ‘हरित’ फटाक्यांच्या आतषबाजीला परवानगी देणे हे पायवाटेने जाऊ पाहणाऱ्यांना महामार्ग खुला करून देण्यासारखेच आहे. असे म्हणण्याचे कारण कोणतीही बंदी मोडण्यात भारतीयांना वाटत आलेले भूषण. कशावरही बंदी आली की छुप्या मार्गाने ती मोडण्याचीच वृत्ती आपल्याकडे दिसून येते. असे असताना सरकारच्या याचिकेवर न्यायालयाने एक पाऊल मागे घेणे ही बाब प्रदूषणाच्या मुद्द्यावर घातकच. याचे कारण दोन तासांचे चार तास, दोनाचे चार दिवस आणि ‘हरित’ फटाक्यांच्या मागून नेहमीचे फटाके कधी येतील ते कुणालाच कळणार नाही.मुळात हरित फटाके हे मिथकच म्हणायला हवे. कारण ते आवाज कमी करतात, पण कमी प्रमाणात का होईना, हवेचे प्रदूषण करतातच. त्यामुळे



त्यांना मर्यादित वेळेत परवानगी देणे हे काही प्रदूषण कमी करायला हातभार लावणारे नाही. त्यात ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात म्हणजे साधारण दिवाळीच्या काळात दिल्ली आणि परिसरात फटाके, शेतातील खुंट जाळणे, वाहनांचा धूर, बांधकामांची धूळ आणि थंड हवेमुळे प्रदूषित धूलिकण जमिनीलगतच तरंगत राहणे या कारणांमुळे प्रचंड प्रदूषण असते. एका आकडेवारीनुसार गेली चार वर्षे दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी दिल्लीतील हवेची गुणवत्ता-पातळी ४०० च्या वर होती. ‘एक्यूआय’ (एअर क्वालिटी इंडेक्स) म्हणून ओळखली जाणारी ही गुणवत्ता-पातळी खरे तर अवगुण किती कमी वा जास्त हे दाखवणारी असते. तिचे ० ते ५० हे प्रमाण योग्य, तर ३०१ ते ५०० हे प्रमाण अतिधोकादायक मानले जाते. यातून, दिवाळीनंतरच्या काळात दिल्लीची अवस्था एखाद्या गॅस चेंबरपेक्षा कमी नसते, हेच लक्षात येते.या कारणांमुळेच २०२४ मध्ये दिल्लीमध्ये फटाकेविक्रीवर पूर्ण बंदी घालण्यात आली होती. पण केंद्र सरकार, दिल्ली सरकार आणि तथाकथित हरित फटाके विक्रेते यांच्या याचिकेवर निर्णय देताना सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्या. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ती शिथिल केली. परंपरा आणि पर्यावरण तसेच फटाका उत्पादकांचा जगण्याचा, व्यवसाय करण्याचा हक्क यांचा एकत्रित विचार करत असल्याचे या खंडपीठाने नमूद केले. सध्या सगळीकडेच भारतीय परंपरेचा उदोउदो केला जातो. पण दिवाळीत फटाके वाजवणे ही काही प्राचीन परंपरा नाही. दिवाळी हा सुगीच्या काळात साजरा केला जाणारा प्रकाशाचा सण. गेली शेकडो वर्षे तो त्याच पद्धतीने साजरा केला जातो. प्रदूषणात दरवर्षी प्रचंड भर घालते आहे. फटाक्यांमुळे दरवर्षी होणारे अपघात हा मुद्दा आहेच

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मुलीचे निर्घृण हत्येप्रकरण

## चाकणकर यांचे पीडितेच्या कुटुंबीयांना आश्वासन...

# फाशीच्या शिक्षेसाठी शिफारस करणार!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सासपडे येथील अल्पवयीन मुलीची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. तिच्या कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा, यासाठी या प्रकरणाची सुनावणी जलदगती (फास्ट्रॅक) न्यायालयात केली जाणार आहे. राज्य महिला आयोगामार्फत आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी शिफारस करणार असल्याचे आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सांगितले.**

## आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सासपडे येथे जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले. या वेळी पोलीस अधीक्षक तुषार दोशी उपस्थित होते.चाकणकर यांनी मुलीच्या कुटुंबीयांची त्यांच्या गावात जाऊन भेट घेतली. या वेळी मुलीच्या आईला अश्रू अनावर झाले. त्यामुळे परिसरातील वातावरण गंभीर झाले. चाकणकर यांनी त्यांच्या मुलीला न्याय मिळवून देण्याबाबत कुटुंबीयांना आश्वस्त केले व तसे आदेश पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना दिले. मुलीच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी पोलीस संरक्षण द्यावे, असे सांगून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर म्हणाल्या, 'मनोधैर्य योजनेतून कुटुंबाला तातडीने मदत करावी. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीतूनही कुटुंबाला मदत मिळवून देण्यात येईल. राज्य महिला आयोग आपल्या पाठीशी असून, न्यायालयात जास्तीत जास्त पुरावे सादर करून आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले जातील.सासपडेसारखी घटना सातारा जिल्ह्यात पुन्हा घडू नये, यासाठी बाललैंगिक अत्याचाराचे (पोक्सो) गुन्हे दाखल असलेले जे गुन्हेगार जामिनावर बाहेर आहेत ते सध्या काय करीत आहेत, याची तपासणी करून काही गैरवर्तन करीत असल्यास त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, असा आदेश चाकणकर यांनी पोलीस विभागाला दिले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या उपनेत्या छाया शिंदे यांनी सासपडे प्रकरणातील पीडितेला तत्काळ न्याय द्यावा व नराधमावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्याकडे केली व निवेदन दिले. मागील आठवड्यात सासपडे (ता. सातारा) येथे एका अल्पवयीन मुलीचा खून झाला होता. या वेळी गावात तणावपूर्ण वातावरण होते. याप्रकरणी मुलीच्या घराशेजारील राहुल बबन यादव या युवकास पोलीसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्याची परवानगी पोलीस कोठडीत केली आहे. मुलीच्या खुनामध्ये गावातीलच युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळताच जमावाने या युवकाच्या घरावर हल्ला केला होता. पोलीसांनी हस्तक्षेप केल्यामुळे या वेळी मोठा अनर्थ टाळला होता. या प्रकरणाची दखल घेऊन महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मुलीच्या कुटुंबियांची भेट घेतली. या खटल्याची सुनावणी जलदगती न्यायालयात केली जाईल, संबंधित आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे चाकणकर यांनी या वेळी सांगितले.राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सासपडे येथे जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले. या वेळी पोलीस अधीक्षक तुषार दोशी उपस्थित होते.चाकणकर यांनी मुलीच्या कुटुंबीयांची त्यांच्या गावात जाऊन भेट घेतली. या वेळी मुलीच्या आईला अश्रू अनावर झाले. त्यामुळे परिसरातील वातावरण गंभीर झाले. चाकणकर यांनी त्यांच्या मुलीला न्याय मिळवून देण्याबाबत कुटुंबीयांना आश्वस्त केले व तसे आदेश पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना दिले. मुलीच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी पोलीस संरक्षण द्यावे.

### कुटुंबाला तातडीने मदत करावी

मनोधैर्य योजनेतून कुटुंबाला तातडीने मदत करावी. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीतूनही कुटुंबाला मदत मिळवून देण्यात येईल. राज्य महिला आयोग आपल्या पाठीशी असून, न्यायालयात जास्तीत जास्त पुरावे सादर करून आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले जातील.सासपडेसारखी घटना सातारा जिल्ह्यात पुन्हा घडू नये, यासाठी बाललैंगिक अत्याचाराचे (पोक्सो) गुन्हे दाखल असलेले जे गुन्हेगार जामिनावर बाहेर आहेत.

# 'मॅनहोल'जाळ्यांनी सुरक्षित आहेत का?

## मुंबई उच्च न्यायालयाची राज्यातील महापालिकांना विचारणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील सर्व महापालिकांनी त्यांच्या हद्दीतील एकूण 'मॅनहोल'ची संख्या आणि किती मॅनहोल संरक्षक जाळ्यांनी सुरक्षित आहेत, याची माहिती सादर करावी, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. डोंबिवली येथे गेल्या महिन्यात १३ वर्षांच्या मुलाचा उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने हे आदेश दिले.**

खड्डयांसंदर्भातील प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी वकील रुजू ठक्कर यांनी ही घटना न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्याची न्यायालयाने दखल घेतली. तसेच, उपरोक्त आदेश दिले. खंडपीठाने कल्याण-डोंबिवली महापालिकेलाही याप्रकरणी नोटीस बजावली असून, उघड्या मॅनहोलचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या ठक्कर यांच्या याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. खड्डयांच्या तक्रारींसाठी न्यायालयाने महापालिका स्तरावर समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. ही समिती स्थापन झाल्यावर तिच्याकडे या



घटनेसंदर्भातील अहवालही सादर करण्यात यावा.

त्यानंतर, ही समिती घटनेसाठीच्या जबाबदारीचे मूल्यांकन करेल आणि भरपाई कशी द्यायची हे ठरवेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.वरळी येथे २०१७च्या पावसाळ्यात डॉ. दीपक अमरापूरकर यांचा उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता. त्यानंतर ठक्कर यांनी उच्च न्यायालयात याचिका करून उघड्या मॅनहोलचा मुद्दा उपस्थित केला होता. न्यायालयाने त्या वेळीही सर्व महापालिकांना मॅनहोल संरक्षक जाळ्यांनी संरक्षित करण्याचे आदेश दिले होते.

मुंबई पालिकेने या सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्यात सक्रिय भूमिका घेतली असली तरी, गेल्या सुनावणीपर्यंत सर्व मॅनहोलमध्ये संरक्षित जाळ्या बसवण्यात आल्या नव्हत्या.

त्यामुळे न्यायालयाने मुंबई पालिकेलाही माहिती सादर करण्याचे आदेश दिले. खड्डयांसंदर्भातील प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी वकील रुजू ठक्कर यांनी ही घटना न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्याची न्यायालयाने दखल घेतली.

### उघड्या मॅनहोलचा मुद्दा उपस्थित

खंडपीठाने कल्याण-डोंबिवली महापालिकेलाही याप्रकरणी नोटीस बजावली असून, उघड्या मॅनहोलचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या ठक्कर यांच्या याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.खड्डयांच्या तक्रारींसाठी न्यायालयाने महापालिका स्तरावर समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

मतदार याद्यांमध्ये घोळ? समंथा आणि रकुल प्रीत सिंह यांची बनावट ओळखपत्रे

# तेलंगणामध्ये मतदार याद्यांमध्ये घोळ?

## निवडणुकीच्या तोंडावर धक्कादायक प्रकार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशात मतदार याद्यांमध्ये घोळ झाल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. यादरम्यान तेलंगणामधील जुबली हिल्स विधानसभा पोटनिवडणुकीच्या तोंडावर एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथे चक्क अभिनेत्री तमन्ना भाटिया, समंथा रूथ प्रभू आणि रकुल प्रीत सिंग यांचे फोटो असलेले बनावट मतदार ओळखपत्रे सापडली आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाचे अधिकारी या प्रकरणाची चौकशी करत आहेत. न्यूज१८ने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. मीडिया रिपोर्टनुसार या तिन्ही मतदार ओळखपत्रांवर एकच पत्ता देण्यात आलेला आहे.**



ज्युबली हिल्स विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक ही ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर याची मतमोजणी ही १४ नोव्हेंबर रोजी केली जाईल. या वर्षी जून महिन्यात बीआरएसचे आमदार मगंती गोपिनाथ यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले होते, त्यामुळे ही पोटनिडणूक घेण्यात येत आहे.तेलंगणामधील सत्ताधारी काँग्रेस पक्षाने व्ही. नवीन याव यांना उमेदवारी दिली आहे. तर त्यांच्या विरोधात बीआरएसने दिवंगत आमदाराची पत्नी मगंती सुनिता यांना तिकिट दिले आहे. लांकाला दीपक रेड्डी हे भाजपाचे उमेदवार देखील रिंगणात आहेत.यापूर्वी, भारत राष्ट्र समितीचे कार्यकारी अध्यक्ष के.टी. रामाराव यांनी काँग्रेसवर जुबली हिल्स मतदारसंघात हजारो बोगस मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप केला होता.“लोक काँग्रेसवर खूप संतापले आहेत, त्यामुळे त्यांना माहिती आहे की त्यांनी मते मिळणार नाहीत. त्यामुळे एकाच घरात, त्यांनी ४३ बनावट मतांची नोदणी केली आहे. प्रत्येक घरात ४३ बनावट मते. एकूण त्यांनी हजारो बनावट मतांची नोंदणी केली आहे. आम्ही त्यावर काम करत आहोत, आवश्यक असेल त्या मार्गाने प्रत्युत्तर दिले जाईल,” असेकेटीआर म्हणाले. यादरम्यान बीआरएसने तेलंगणा उच्च न्यायालयात ज्युबली हिल्स येथील कथित बनावट मतदारांच्या प्रकरणा याचिका दाखल केली आहे.

बीआरएस पक्षाच्या जुबली हिल्सच्या उमेदवार मागांती सुनिता यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी वेळी, उच्च न्यायालयाने या प्रकरणात कोणतेही निर्देश देण्याची आवश्यकता नसल्याचे म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोग आधीच मतदार याद्यांमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया करत असल्याने, न्यायालय पुढील कोणतेही आदेश जारी करू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयात माहिती दिली की, बीआरएस नेत्यांच्या तरारीनंतर त्यांनी आधीच जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना प्रकरणाच्या पडताळणीचे आदेश दिले आहेत. ज्युबली हिल्स विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक ही ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर याची मतमोजणी ही १४ नोव्हेंबर रोजी केली जाईल. या वर्षी जून महिन्यात बीआरएसचे आमदार मगंती गोपिनाथ यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले होते, त्यामुळे ही पोटनिडणूक घेण्यात येत आहे. तेलंगणामधील सत्ताधारी काँग्रेस पक्षाने व्ही. नवीन याव यांना उमेदवारी दिली आहे. तर त्यांच्या विरोधात बीआरएसने दिवंगत आमदारची पत्नी मगंती सुनिता यांना तिकिट दिले आहे. लांकाला दीपक रेड्डी हे भाजपाचे उमेदवार देखील रिंगणात आहेत. यापूर्वी, भारत राष्ट्र समितीचे कार्यकारी अध्यक्ष के.टी. रामाराव यांनी काँग्रेसवर जुबली हिल्स मतदारसंघात हजारो बोगस मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप केला होता.“लोक काँग्रेसवर खूप संतापले आहेत, त्यामुळे त्यांना माहिती आहे.

### याद्यांमध्ये तमन्ना भाटिया

. त्यामुळे एकाच घरात, त्यांनी ४३ बनावट मतांची नोदणी केली आहे. प्रत्येक घरात ४३ बनावट मते. एकूण त्यांनी हजारो बनावट मतांची नोंदणी केली आहे. आम्ही त्यावर काम करत आहोत, आवश्यक असेल त्या मार्गाने प्रत्युत्तर दिले जाईल,” असेकेटीआर म्हणाले.यादरम्यान बीआरएसने तेलंगणा उच्च न्यायालयात ज्युबली हिल्स येथील कथित बनावट मतदारांच्या प्रकरणा याचिका दाखल केली आहे.

# गुजरातच्या राजकारणात फेरबदल

## मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल सोडून सर्व मंत्र्यांचा राजीनामा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गुजरातच्या राजकारणात एक मोठा बदल पाहण्यास मिळतो आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाने राजीनामा दिला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल सोडून सर्व मंत्र्यांनी राजीनामा दिली आहे. त्यामुळे आता नव्या मंत्रिमंडळाची निवड प्रक्रिया सुरु झाली आहे.**

मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांची भेट घेतील आणि नव्या मंत्रिमंडळ स्थापनेचा प्रस्ताव ठेवतील. शुक्रवारी शपथविधी सोहळा पार पडेल आणि नव्या मंत्र्यांना शपथ दिली जाईल. मुख्यमंत्री वगळून इतर सगळ्या मंत्र्यांनी राजीनामा देण्याच्या या घटनेने गुजरात चर्चेत आलं आहे. भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांकडून आलेल्या माहितीनुसार मंत्रिमंडळ विस्तारात नव्या १० चेहऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. तसंच अर्ध्याहून अधिक मंत्र्यांना बदलण्यात येणार आहे.

गुजरात सरकारमध्ये सध्या १७ मंत्री आहेत ज्यापैकी आठ कॅबिनेट आहेत, बाकीचे राज्यमंत्री आहेत. संविधानातील तरतुदीनुसार १८२ सदस्यांच्या विधानसभेसाठीचं मंत्रिमंडळ




२७ मंत्र्यांपर्यंत वाढवण्याची मुभा आहे.गुजरातच्या राजकारणात हे फेरबदल होत आहेत, जगदीश विश्वकर्मा गुजरात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर हे फेरबदल पाहण्यास मिळत आहेत. भुपेंद्र पटेल सरकारमध्ये जगदीश विश्वकर्मा मंत्री होते. तसंच या सगळ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हे देखील गुजरातला पोहचले आहेत. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.राजकीय जाणकारांनी दिलेल्या माहितीनुसार गुजरातच्या राजकारणात भाजपाकडून हे बदल केले जात आहेत कारण राज्यात नवी उर्जा आणि उत्साह असला पाहिजे असं भाजपाला वाटतं आहे. त्यामुळे भाजपाच्या तरुण नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिलं जातं आहे.

पाटीदार समाज आणि ओबीसी समाज यांचं संतुलन मंत्रिमंडळात पाहण्यास मिळेल यावरही पक्षाने भर दिला आहे. गुजरातच्या या नव्या समीकरणाकडे २०२७ च्या मिशन च्या दृष्टीनेही पाहिलं जातं आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आपने पाटीदार समाजात त्यांचं महत्त्व वाढवलं आहे. भुपेंद्र पटेल यांनी १२ डिसेंबर २०२२ ला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.

### १० नव्या चेहऱ्यांना संधी?

अधिक मजबूत करतील असा विश्वास भाजपाच्या नेत्यांना वाटतो आहे.गुजरात सरकारमध्ये सध्या १७ मंत्री आहेत ज्यापैकी आठ कॅबिनेट आहेत, बाकीचे राज्यमंत्री आहेत. संविधानातील तरतुदीनुसार १८२ सदस्यांच्या विधानसभेसाठीचं मंत्रिमंडळ २७ मंत्र्यांपर्यंत वाढवण्याची मुभा आहे.

# लग्नानंतर 5 वर्षांनी मराठी अभिनेत्रीच्या घरी पाळणा हलला!

लग्नानंतर अनेक अभिनेत्री करिअरला ब्रेक देऊन आपलं वैयक्तिक आयुष्य तसेच संसार व घर सांभाळण्यास प्राधान्य देत असल्याचं आपण पाहिलं आहे. याशिवाय बॉलीवूडपासून ते मराठी इंडस्ट्रीपर्यंतच्या काही अभिनेत्री गेल्या काही वर्षांत लग्नानंतर विदेशात स्थायिक झाल्या आहेत. मराठी मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेल्या अभिनेत्री नेहा गद्रेने सुद्धा काही वर्षांपूर्वीच इंडस्ट्री सोडून परदेशी राहण्याचा निर्णय घेतला. यानुसार, नेहा सध्या आपल्या पतीसह ऑस्ट्रेलियात असते.'मन उधाण वाऱ्याचे', 'अजूनही चांद रात आहे' या मालिकांमुळे आणि 'मोकळा श्वास' या चित्रपटामुळे नेहाला एक वेगळी ओळख मिळाली होती. परंतु, सध्या ती अभिनयापासून दूर आहे. वैयक्तिक आयुष्यात २ मार्च २०१९ मध्ये तिने ईशान बापटशी विवाह केला. सध्या ते दोघेही ऑस्ट्रेलियात राहतात. काही दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनाऱ्यावर बेबी बंपसह फोटो शूट



करत नेहाने आई होणार असल्याची गोड बातमी सर्वांना दिली होती. याशिवाय तिने जेंडर रिव्हिल सुद्धा केलं होतं. बाळाच्या जन्माआधी लिंग चाचणी करणं भारतात बेकायदेशीर आहे पण, विदेशात याला परवानगी आहे. त्यामुळे नेहाला आधीच मुलगा होणार की मुलगी हे समजलं होतं. जेंडल रिव्हिल केल्यावर नेहाला तिला मुलगा होणार असल्याची बातमी मिळाली. अभिनेत्रीने १० फेब्रुवारीला बाळाचं स्वागत केलं. यानंतर आज सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत नेहाने आई झाल्याची आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे.

# रणवीरच्या अडचणीत वाढ

गेल्या काही दिवसांपासून देशभरात 'इंडियाज गॉट लेटेंट' मधील आक्षेपार्ह विधानांमुळे रणवीर अलाहाबादीया हे नाव चर्चेत आहे. युट्यूबर आणि कॉमेडियन समय रैनाचा 'इंडियाज गॉट लेटेंट' हा कार्यक्रम लोकप्रिय आहे. मात्र, या कार्यक्रमात यूट्यूबर आणि पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला आक्षेपार्ह प्रश्न विचारल्याने तो वादात सापडला आहे. यावरून सोशल मीडिया वापरकर्त्यांसह विविध क्षेत्रातील लोकांकडून टीका करण्यात आली आहे. यावरून रणवीर अलाहाबादियाने माफी देखील मागितली. मात्र, आता रणवीर अलाहाबादियाला महाराष्ट्र सायबर सेलने २४ फेब्रुवारीला हजर राहण्यासाठी समन्स बजावल्याची माहिती समोर आली आहे. रणवीर अलाहाबादियाने 'इंडियाज गॉट लेटेंट' या वेब शोमध्ये पालक आणि लैंगिक संबंधांबद्दल केलेल्या वक्तव्यानंतर रणवीर अलाहाबादिया आणि इतरांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्याचा तपास एजन्सींकडून करण्यात येत आहे. रणवीर अलाहाबादियाने केलेल्या वादग्रस्त विधानांतर महाराष्ट्र सायबर विभागाने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणातील अनेकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहेत.



# क्रांतीची 'छावा'वर प्रतिक्रिया

सध्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेल्या 'छावा' चित्रपटाची चर्चा सुरू आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारलेल्या विकी कौशलवर कौतुकाचा वर्षाव होतं आहे. १३० कोटींचं बजेट असलेल्या 'छावा' चित्रपटाने भारतात आतापर्यंत १२१ कोटींची कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसवर सध्या 'छावा' चित्रपटाची जोरदार घोडदौड पाहायला मिळत आहे. इतर कलाकार मंडळी सोशल मीडियावरद्वारे या चित्रपटाविषयी प्रतिक्रिया देत, चाहत्यांना चित्रपट पाहण्याचं आवाहन करताना दिसत आहेत. नुकताच अभिनेत्री क्रांती रेडकरने इन्स्टाग्राम व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये तिने 'छावा' चित्रपट पाहिल्यानंतरचा अनुभव सांगितला आहे. तसंच विकी कौशल, रश्मिका मंदाना, आशुतोष राणा, संतोष जुवेकर अशा चित्रपटातील सर्व कलाकारांचं कौतुक केलं आहे. क्रांती रेडकर म्हणाली, "माझे डोळे आताही सुजलेले दिसतायत. मी काल 'छावा' हा चित्रपट बघून आलीये. हा चित्रपट समजून घेण्यासाठी खूप अवघड आहे आणि तुम्हाला माणूस म्हणून जाणीव करून देतो की, तुम्ही समाजात कुठे उभे राहत आहात? माझी अशी इच्छा आहे, तुम्ही मराठी असाल किंवा अमराठी असाल, हा चित्रपट तुम्ही चित्रपटगृहात जाऊन बघा. हा एक खूप वेगळा अनुभव आहे."पुढे क्रांती रेडकर म्हणाली की, मला असं वाटतं की, धर्मवीर, छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत विकी कौशलने जे काम केलं आहे, ते इतकं स्तुत्य आहे. इतकं सुंदर आहे. ते महाराज होते, ते राजे होतेच. ते बघताना आपल्या अंगावर शहारा येत असतो. त्यांची प्रत्येक हालचाल, त्यांची प्रत्येक नजर, त्यांची देहबोली, त्यांनी ज्या प्रकारे चित्रपट डब केलाय, मला वाटतं, तो मास्टर क्लास आहे. प्रत्येक नटासाठी सुद्धा. तसंच रश्मिका मंदाना, आशुतोष राणा, संतोष जुवेकर बाकीच्या आपल्या सगळ्या मराठी कलाकारांनी जी साथ दिलीये, त्याच बरोबर सिनेमॅटोग्राफी, मेकअप डिपार्टमेंटला तर साष्टांग दंडवत आहे.

# इब्राहिमच्या 'नादानियां' चित्रपटातील नवं गाणं प्रदर्शित

दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूर ( KHUSHI KAPOOR ) आणि सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान ( IBRAHIM ALI KHAN ) सध्या खूप चर्चेत आहेत. खुशी आणि इब्राहिमचा लवकरच 'नादानियां' नावाचा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. याच चित्रपटातील दुसरं गाणं प्रदर्शित झालं आहे. 'गलतफेहमी' असं नव्या गाण्याचं नाव असून सध्या ट्रेंड होतं आहे.'नादानियां' या चित्रपटातून सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. या चित्रपटात तो खुशी कपूरबरोबर मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी 'नादानियां' चित्रपटातील पहिलं गाणं प्रदर्शित झालं होतं. या गाण्यातील खुशी आणि इब्राहिमची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूपच आवडली होती. त्यानंतर आता 'गलतफेहमी' हे दुसरं गाणं प्रेक्षकांच्या भेटीस आलं आहे. या गाण्यातून पुन्हा एकदा खुशी आणि इब्राहिमची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळत आहे.'नादानियां' चित्रपटातील 'गलतफेहमी' हे गाण्यावर प्रतिक्रिया देत एका नेटकऱ्याने लिहिलं, "हे गाणं ऐकून खूप भारी वाटलं." तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं की, तुमच्या दोघांची केमिस्ट्री खूप छान आहे. मी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे. तसंच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "गाणं खूप छान आहे. मी सतत हे गाणं ऐकत आहे."दरम्यान, शौना गौतम यांना 'नादानियां' चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. धर्मा प्रोडक्शनच्या निर्मिती खाली हा चित्रपट तयार झाला आहे. या चित्रपटात खुशी कपूरने पिया नावाच्या मुलीची भूमिका साकारली आहे.

# ता अंबानींच्या थोरल्या सूनेच्या 'त्या' कृतीने सगळ्यांची जिंकली मनं

भारताचे मोठे उद्योगपती मुकेश अंबानी आणि त्यांचं कुटुंब नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतं. काही दिवसांपूर्वी मुकेश अंबानी आणि नीता अंबानींची धाकटी सून एका संगीत सोहळ्यामध्ये जबरदस्त डान्स करताना दिसली होती. तसंच त्याआधी अंबानी कुटुंब प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्यात पाहायला मिळालं. यावेळी अंबानी कुटुंबाने एकत्र शाही स्नान केलं. याचे व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले आहेत. त्यानंतर आता मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांच्या थोरल्या सूनेच्या एका व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हा व्हिडीओ पाहून अंबानींची थोरली सून श्लोका मेहताचं कौतुक केलं जात आहे.करीना कपूर-खान आणि सैफ अली खानचा मुलगा जेहची वाढदिवसाची पार्टी नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या पार्टीला श्लोका



आपल्या मुलांना वेदा आणि पृथ्वीला घेऊन पोहोचली होती. या पार्टीतून बाहेर पडतानाच्या श्लोकाच्या एका कृतीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.व्हायरल व्हिडीओमध्ये, श्लोका आपल्या मुलांना घेऊन जेहच्या वाढदिवसाच्या पार्टीतून बाहेर पडताना दिसत आहे. यावेळेस दोन्ही मुलं मस्ती करत करत बाहेर पडतात. तेव्हा एकाच्या हातात भेटवस्तू दिसत आहे. ती भेटवस्तू बघण्यासाठी तो त्यावरचा कागद फाडत येत असतो आणि तेव्हाच त्याचा हातातून एक कागदाचा तुकडा खाली पडतो. हाच कागदाचा तुकडा पाहून लगेच श्लोका खाली वाकते.

## तेव्हा तुम्ही हरता

## कोहलीची निवृत्तीच्या चर्चांदरम्यान क्रिप्टिक पोस्ट

# तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने हरता

## पोस्ट शेअर करत सर्वांचं लक्ष वेधलं



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी विराट कोहली टीम इंडियासह पर्थमध्ये दाखल झाला आहे. येत्या १९ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या वनडे मालिकेपूर्वी रोहित-विराटची कारकीर्द आणि हे दोघेही २०२७चा विश्वचषक जिंकणार का याची जोरदार चर्चा सुरू आहे. या चर्चांदरम्यान विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाला पोहोचताच एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली आहे.**

विराट कोहली अखेरचा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात खेळताना दिसला होता. यानंतर आता थेट ६ महिन्यांनंतर विराट मैदानावर खेळण्यासाठी उतरणार आहे. १६ ऑक्टोबरला पहाटेच विराट-रोहितसह टीम इंडिया पर्थमध्ये दाखल झाली. यादरम्यानचे रोहित-विराटचे व्हीडिओदेखील व्हायरल झाले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये पोहोचल्यानंतर विराट कोहलीने एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली आहे, ज्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. विराटच्या या पोस्टमुळे सर्वत्र चर्चांना उधाण आलं आहे. विराटच्या या पोस्टला त्याच्या निवृत्तीबद्दलच्या चर्चांशी जोडलं जात आहे. विराट कोहलीने कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि आता तो फक्त एकदिवसीय क्रिकेटमध्ये टीम इंडियाचा भाग आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धची एकदिवसीय मालिका ही विराट कोहलीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची मालिका असू शकते, अशी चर्चा आहे. यादरम्यान विराट कोहलीने पोस्ट शेअर करत म्हटलं, “जेव्हा तुम्ही प्रयत्नांची साथ सोडता तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने हरता.” चाहते आणि क्रिकेट तज्ञ आता कोहलीच्या या पोस्टकडे त्याच्या क्रिकेट कारकिर्दीसंबंधित चर्चांना उत्तर म्हणून पाहत आहेत.३६ वर्षीय विराट कोहलीची ही पोस्ट पाहता आता तो २०२७ चा वनडे वर्ल्डकप खेळणार असल्याचं चाहते म्हणथ आहेत. सर्वांचे लक्ष विराटच्या फिटनेस आणि फॉर्मवर असेल, कारण हा ऑस्ट्रेलिया दौरा त्याच्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरूद्ध मालिकेत त्याच्या जुन्या शैलीत वादळी फटकेबाजी करताना दिसावा, अशी चाहते आशा करत आहेत. ऑस्ट्रेलियातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमधील निराशाजनक कामगिरीनंतर, विराट कोहलीने मे महिन्यात IPL 2025 चा हंगाम सुरू असतानाच निवृत्ती जाहीर केली. विशेष म्हणजे, त्याने याच हंगामात आपल्या कारकिर्दीतील पहिलं IPL विजेतेपदही आपल्या नावे केलं.विराट कोहली अखेरचा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात खेळताना दिसला होता. यानंतर आता थेट ६ महिन्यांनंतर विराट मैदानावर खेळण्यासाठी उतरणार आहे. १६ ऑक्टोबरला पहाटेच विराट-रोहितसह टीम इंडिया पर्थमध्ये दाखल झाली. यादरम्यानचे रोहित-विराटचे व्हीडिओदेखील व्हायरल झाले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये पोहोचल्यानंतर विराट कोहलीने एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली आहे, ज्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. विराटच्या या पोस्टमुळे सर्वत्र चर्चांना उधाण आलं आहे. विराटच्या या पोस्टला त्याच्या निवृत्तीबद्दलच्या चर्चांशी जोडलं जात आहे. विराट कोहलीने कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि आता तो फक्त एकदिवसीय क्रिकेटमध्ये टीम इंडियाचा भाग आहे.ऑस्ट्रेलियाविरुद्धची एकदिवसीय मालिका ही विराट कोहलीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची मालिका असू शकते, अशी चर्चा आहे. यादरम्यान विराट कोहलीने पोस्ट शेअर करत म्हटलं, “जेव्हा तुम्ही प्रयत्नांची साथ सोडता तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने हरता.” चाहते आणि क्रिकेट तज्ञ आता कोहलीच्या या पोस्टकडे त्याच्या क्रिकेट कारकिर्दीसंबंधित चर्चांना उत्तर म्हणून पाहत आहेत.३६ वर्षीय विराट कोहलीची ही पोस्ट पाहता आता तो २०२७ चा वनडे वर्ल्डकप खेळणार असल्याचं चाहते म्हणथ आहेत. सर्वांचे लक्ष विराटच्या फिटनेस आणि फॉर्मवर असेल.

### जुन्या शैलीत वादळी फटकेबाजी

कारण हा ऑस्ट्रेलिया दौरा त्याच्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरूद्ध मालिकेत त्याच्या जुन्या शैलीत वादळी फटकेबाजी करताना दिसावा, अशी चाहते आशा करत आहेत.ऑस्ट्रेलियातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमधील निराशाजनक कामगिरीनंतर, विराट कोहलीने मे महिन्यात IPL 2025 चा हंगाम सुरू असतानाच निवृत्ती जाहीर केली.

# पाकिस्तानात सुरक्षेचे तीन तेरा!

## बाबर आझमला भेटण्यासाठी फॅनने नेमकं काय केलं




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रत्येक क्रिकेट चाहत्याचं स्वप्न असतं की त्यांनी एकदा तरी आपल्या आवडत्या खेळाडूला भेटावं. पण हे सहज शक्य होत नाही. कारण मैदानात आणि मैदानाबाहेर असतानाही खेळाडूंच्या आसपास सुरक्षारक्षक असतात. पण लाईव्ह सामन्यादरम्यान क्रिकेट चाहते मैदानात घुसखोरी करून खेळाडूंची भेट घेतात. त्यानंतर त्यांच्यावर कारवाई होते.**

पण खेळाडूंना भेटण्याचं स्वप्न मात्र पूर्ण होतं. पण पाकिस्तानात भलताच प्रकार घडला आहे. सामना पाहण्यासाठी आलेल्या क्रिकेट चाहत्याने सुरक्षा रक्षकांची नजर चुकवून थेट पाकिस्तानच्या ड्रेसिंग रूममध्ये एंट्री केली आहे. ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमचा १५ ऑक्टोबरला वाढदिवस होता. त्यावेळी तो पाकिस्तान विरूद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना खेळण्यात व्यस्त होता. या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत विजयी सुरूवात केली. पण या सामन्यानंतर घडलेल्या घटनेची जोरदार चर्चा रंगली आहे.सोशल मीडियावर एक व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे. व्हायरल होत असलेला व्हिडीओ लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममधला आहे. या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, एक क्रिकेट चाहता गॅलरीला लटकून पाकिस्तानच्या ड्रेसिंग रूममध्ये प्रवेश करतो. तो बाबर आझमला भेटण्यासाठी आलेला असतो. पण संघातील सहखेळाडू त्याला माघारी जाण्यासाठी सांगतात. पण तो पुन्हा एकदा बाबर आझमला भेटण्यासाठी पुढे आला.

### बाहेर काय घडत होतं

त्यानंतर सुरक्षारक्षक त्याला पकडून बाहेर घेऊन जातात. यावरून पाकिस्तानातील स्टेडियममध्ये खेळाडू सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित केला जाऊ लागला आहे. ज्यावेळी तो क्रिकेट चाहता बाबर आझमला भेटण्यासाठी ड्रेसिंग रुममध्ये आला, त्यावेळी बाबर आझम आतमध्येच होता. पण त्याला बाहेर काय घडत होतं याबाबत कल्पना नव्हती.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 17 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### आदर्शवत उपक्रम: इर्मॅजिका पार्क सोसायटीने

# सौर ऊर्जा क्रांतीचा घेतला पुढाकार!

## संजीवन सांगळे : विजेचे बिल शून्यावर, पर्यावरण रक्षणात मोलाची भर!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : इर्मॅजिका पार्क सहकारी गृह रचना संस्थेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलत ४० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प स्वखर्चाने यशस्वीपणे उभारला आहे. या पर्यावरणपूरक प्रकल्पाचे उद्घाटन सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. संजीवन सांगळे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.**



या प्रकल्पामुळे सोसायटी विजेसाठी पूर्णतः स्वावलंबी झाली असून, पूर्वी येणारे भरमसाठ वीजबिल आता शून्यावर आले आहे. विशेष म्हणजे, सौर प्रकल्पातून निर्माण होणारी अतिरिक्त वीज महावितरणकडून खरेदी केली जाणार आहे, ज्यामुळे सोसायटीला आर्थिक लाभही मिळणार आहे.

उद्घाटन प्रसंगी सोसायटीचे चेअरमन श्री. प्रशांत निखाडे, सर्व कमिटी सदस्य आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. हा प्रकल्प पूर्णत्वास नेल्यामुळे सोसायटीमध्ये आनंद आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले, "इर्मॅजिका पार्क सोसायटीने जो सौर ऊर्जा प्रकल्प राबवला आहे, त्यातून निसर्गाची स्वच्छ, हरित आणि शाश्वत ऊर्जा मिळणार आहे. यामुळे केवळ विजेची बचत होणार नाही, तर पर्यावरण रक्षणातही मोठा वाटा उचलला जाईल. शहरातील इतर सोसायट्यांनीही हा आदर्श घेऊन सौर प्रकल्प बसवावेत आणि भविष्यासाठी सुरक्षित पाऊल उचलावे." हा प्रकल्प केवळ ऊर्जा निर्मितीपुरता मर्यादित नसून, हरित जीवनशैलीचा एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. पिंपरी चिंचवडमधील इतर सोसायट्यांसाठी ही एक सकारात्मक चळवळ सुरू होण्याची नांदी म्हणावी लागेल.

> "इर्मॅजिका पार्क सोसायटीने स्वखर्चाने बसवलेला ४० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प हा केवळ विजेची बचत करणारा नव्हे, तर पर्यावरण रक्षणासाठीही एक मोलाचा उपक्रम आहे. प्रत्येक सोसायटीने अशा प्रकारे सौर ऊर्जा प्रकल्प राबवून आपल्या परिसराला स्वच्छ आणि हरित ठेवण्याचा प्रयत्न करावा. यामुळे केवळ विजेवरचा आर्थिक भार कमी होणार नाही तर आपण निसर्गाच्या संवर्धनासाठीही हातभार लावू शकतो."
> **-संजीवन सांगळे,** अध्यक्ष, हाउसिंग सोसायटी फेडरेशन.

---

### वसुबारसेला गोपुजन, वर्षभरासाठी गोरक्षणाचा संकल्प

## भाजपा युवा मोर्चाचा पुढाकार; अध्यक्ष दिनेश यादव यांची माहिती

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली आणि कुदळवाडी परिसरात वसुबारस निमित्ताने विविध ठिकाणी गाय-वासरांचे पूजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक गोसेवक आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन गोरक्षणाचा संकल्प करत पूजनाचे आयोजन केले आहे. यासाठी भाजपा युवा मोर्चाच्या वतीने पुढाकार घेण्यात आलेला आहे अध्यक्ष दिनेश यादव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.**

याबाबत भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव म्हणाले, गाय आणि वासराचे पूजन ही भारतीय संस्कृतीतील एक श्रद्धेची बाब आहे. गोमातेचे केवळ धार्मिकच नाही तर सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. या वर्षी वसुबारस साजरी करताना नागरिकांनी केवळ पूजनापुरते मर्यादित न राहता, वर्षभर गोरक्षणासाठी कार्य करावे, असा संदेश देण्यात आला आहे.




शुक्रवारी (दि 17)पूजनासाठी चंद्रभागा गोशाळा, रामदास नगर, चिखली, पै. निलेश यादव फार्म, प्रथमेश पार्क शेजारी, कुदळवाडी गणेश किसन आप्पा यादव फार्म, इंद्रायणी वजन काट्या मागे, कुदळवाडी येथे गोसेवा पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या ठिकाणी परिसरातील नागरिक, गोभक्त, शेतकरी आणि महिला मंडळ मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. कार्यक्रमामध्ये पारंपरिक पद्धतीने पूजन, गोसेवेचे महत्त्व सांगणारे मार्गदर्शन, तसेच स्थानिक पातळीवर गोरक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

## डॉ. डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा

# बॅडमिंटन संघ SPPU इंटरकॉलेजिएट स्पर्धेचा विजेता!

### 54 संघांमध्ये बाजी मारत कष्ट, कौशल्य आणि संघभावनेच्या जोरावर डायवाय पाटील कॉलेजने पटकावले

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील पीसीसीओई निगडी येथे आयोजित ५४ संघांच्या सहभागात झालेल्या स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्र विद्यापीठ (SPPU) अंतर्गत होणाऱ्या इंटरकॉलेजिएट बॅडमिंटन (पुरुष) स्पर्धेत डायवाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा बॅडमिंटन बॉईज संघ विजेता ठरला आहे. या स्पर्धेत टीमने उत्कृष्ट सामंजस्य, कौशल्य आणि चिकाटीने खेळ दाखवून कॉलेजचा मान वाढविला आहे.**



संपूर्ण स्पर्धा काळात डायवाय पाटील कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. ५४ संघांच्या मोठ्या स्पर्धेत त्यांचा विजय विशेष उल्लेखनीय आहे. विविध फेरींमध्ये सशक्त सामना देत संघाने फाइनलपर्यंतची वाट सोपी न करता कष्ट घेतले आणि अखेर विजेतेपद पटकावले. शस्वी संघामध्ये प्रशिक्षित आणि अनुभवी प्रशिक्षक मंडळाने खेळाडूंना योग्य मार्गदर्शन केले. या यशामागे कॉलेजचे ट्रस्टी तेजस पाटील सर, कॅम्पस डायरेक्टर रिअर ॲडमिरल अमित विक्रम (सेवानिवृत्त), प्रिन्सिपल डॉ. पी. माळती, डीन ॲडमिनिस्ट्रेशन डॉ. एस. एस. सर्नोबट व फिजिकल एज्युकेशनचे डायरेक्टर श्री. अबाजी माने यांचे महत्वाचे योगदान आहे.

प्रशिक्षक आणि विद्यार्थी संघाच्या कामगिरीबद्दल अत्यंत समाधान व्यक्त करत असून, आगामी स्पर्धांमध्येही अशाच जोमाने कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. डायवाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने या विजयानंतर बॅडमिंटन क्षेत्रात आपली मजबूत छाप सोडली असून विद्यार्थ्यांच्या खेळ क्षेत्रातील प्रगतीसाठी पुढेही सर्वतोपरी सहकार्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

---

# वाचन प्रत्येकासाठी कौशल्य वाढविणारे उत्तम व्यासपीठ!

### एमआयटी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुस्तके म्हणजे चालते फिरते ज्ञानाचे व्यासपीठ आहे. पुस्तकांचे वाचन प्रत्येकासाठी कौशल्य वाढविणारा एक उत्तम व्यासपीठ आहे असे मत संत ज्ञानेश्वर बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य समाधान निकम यांनी व्यक्त केले.**



माजी राष्ट्रपती आणि प्रख्यात वैज्ञानिक ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी साजरा करण्यात येणारा “वाचन प्रेरणा दिवस” एम आय टी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग तसेच सायन्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने “अंतरमहाविद्यालयीन बुक टॉक स्पर्धेचे” आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीची जाणीव निर्माण करणे, वाचनाची आवड वाढवणे आणि वाचनाच्या माध्यमातून वैचारिक व व्यक्तिमत्त्व विकास घडवणे हा होता. एकूण ३६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी भगवद्गीता, इंग्रजीतील प्रसिद्ध लेखकांची पुस्तके तसेच विविध प्रेरणादायी ग्रंथांवर आधारित विचार प्रभावीपणे मांडले.

परीक्षकांनी विद्यार्थ्यांचे सादरीकरण, आत्मविश्वास, विषयज्ञान, भाषाशैली आणि प्रभावी मांडणी या पाच निकषांवर मूल्यांकन केले. स्पर्धेत दिया चौधरी प्रथम, श्रीप्रिया पिल्ले द्वितीय तर महेश खताने तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले. विजेत्यांना अनुक्रमे दोन हजार, एक हजार आणि पाचशे रुपयांची रोख पारितोषिके आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे मूल्यमापन संत ज्ञानेश्वर बी एड महाविद्यालयाचे प्राचार्य समाधान निकम यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, बुक टॉक म्हणजे वाचलेल्या पुस्तकातील विचार, कथानक, पात्रे आणि प्रेरणादायी संदेश प्रभावीपणे आपल्या शब्दांत सादर करणे. हा उपक्रम वाचनाची आवड निर्माण करणारा आणि सादरीकरण कौशल्य वाढविणारा एक उत्तम व्यासपीठ आहे.

कार्यक्रमाचे स्वागत भाषण महाविद्यालयाचे संचालक बी बी वाफारे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात वाचनाचे जीवनातील महत्त्व स्पष्ट करताना नमूद केले की.वाचन हा केवळ अभ्यासाचा भाग नसून जीवन समृद्ध करणारा आत्मानुभव आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयत संकर, श्रावणी नेहरकर आणि शरण्या नायर (कॉम्प्युटर सायन्स - प्रथम वर्ष) यांनी केले. प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन ग्रंथपाल राहुल बाराथे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बुक टॉक स्पर्धा ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा जागवणारा एक सुंदर उपक्रम आहे. डिजिटल युगात वाचनाशी पुन्हा नाते जोडणे आवश्यक असून पुस्तक हे केवळ माहितीचेच नव्हे तर प्रेरणेचेही स्रोत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, भाषणकला आणि विचारमंथनाची सवय निर्माण होते.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune